# भारतीय महाविद्यालय, अमरावती
# राष्ट्रीय सेवा योजना
**(2015-16)**

**प्रा. निलेश कडू**
कार्यक्रम अधिकारी
**डॉ. आम्रपाली वासनिक**
महिला कार्यक्रम अधिकारी

---

# नियमित कार्यक्रम अहवाल

**इ. स. 1969 साली महात्मा गांधीजींच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या विचारांची प्रेरणा केंद्रस्थानी ठेऊन युवकांना समाज व देशकार्यात सहभागी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना करण्यात आली. राष्ट्रनिर्मांणाची जाणीव विद्यार्थीदशेत विद्यार्थ्यात व्हावी व त्यांनी आपल्या कल्पकतेने राष्ट्र उभारणीसाठी हातभार लावावा या हेतूने राष्ट्रीय सेवा योजना ही युवकांना प्रेरणा देणारी एक चळवळ आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय सेवा योजना भारत सरकारच्या युवा कल्याण व क्रिडा मंत्रालय अंतर्गत राबविण्यात येते.**

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित भारतीय महाविद्यालय, अमरावती येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाला 200 (100 मुले + 100 मुली) विद्यार्थ्यांची मान्यता आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या 'Not Me, But You' या ब्रिदवाक्यानुसार महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करणे व त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचे कार्य आमच्या महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत नियामित कार्यक्रमाच्या व विशेष शिबिराच्या माध्यमातून सतत सुरु आहे.**

**महाविद्यालयात 2015-16 या शैक्षणिक सत्रात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून पुढील नियामित कार्यक्रम राबविण्यात आले. त्या सत्रातील नोंदी पुढीलप्रमाणे आहे.**

### 1. गुरुपोर्णिमा: -

31 जुलै 2015 रोजी महाविद्यालयात गुरुपौर्णिमाचा कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजने मार्फत आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद भारतीय विद्यामंदीराचे सरचिटणिस डॉ. आराधना वैद्य यांनी भुषविले तर प्रमुख पाहूणे म्हणून डॉ. अलका गायकवाड, प्रा. नितिन तट्टे, प्रा. विद्या पाथरकर लाभले. कार्यक्रमाला रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी प्रा.निलेश कडू, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. आम्रपाली वासनिक व सहकार्यक्रम अधिकारी प्रा. पंडीत काळे, प्रा. गायत्री चवाळे उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना

प्रा. पंडीत काळे यांनी केले. प्रास्तावनेंतर्गत त्यानी 'गुरु हा राष्ट्राचा अभियंता' असा संदेश रा. से यो. च्या स्वयंसेवकांना दिला. ' शिष्याने ध्येय प्राप्तीची तीव्र इच्छा बाळगून, अथक परीश्रम करुन ध्येय प्राप्ती करणे हिच खरी गुरुदक्षिणा' असे मत प्रा. विद्या पाथरकर यांनी व्यक्त केले. प्रा. नितिन तट्टे यांनी आपल्या भषणादरम्यान पूर्व राष्ट्रपती ए. पी. जे. कलाम यांच्या आठवणींना स्पर्श केला. डॉ. अलका गायकवाड यांनी गुरुशिष्याचे नात स्पष्ट करत अनेक उदाहरणे दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. रश्मी जिवतोडे हिने केले व आभार प्रदर्शन कु. आरती धनुष्कर हिने मानले. या कार्यक्रमासाठी रा. से. यो. स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

## 2. क्रांतिदिन: -

09 ऑगस्ट 2015 रोजी क्रांतिदिनाचे औचित्य साधून, विद्यार्थी व नागरिकांमध्ये ज्या हुतात्म्यांनी आपल्या देशाला स्वातंत्र मिळविण्यासाठी व क्रांतीच्या आधारे सर्वस्व अर्पण केले अशा क्रांतीविरांची आठवण व जनजागृती निर्माण करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी शहीद भगतसिंग व चंद्रशेखर आझाद यांच्या प्रतिमेचे पूजान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार व रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू यांच्या हस्ते करण्यात आले. नागरिकांना हुतात्म्यांच्या प्रतिमेचे पूजन करता येईल या हेतूने राजापेठ बडनेरा रस्त्यावर हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात भरपूर लोकांनी सहभाग घेतला व क्रांतिदिनानिमित्य आपली मते विद्यार्थ्यांसमोर मांडली. या सर्व उपक्रमाचे आयोजन रा. से. यो. स्वयंसेवकांनी उत्कृष्ठरित्या केले व सायंकाळी या कार्यक्रमाची सांगता झाली.

## 3. पथनाट्यातून जनजागृती: -

15 ऑगस्ट 2015 रोजी स्वातंत्र दिनाच्या पर्वावर ध्वजारोहण नंतर राष्ट्रीय सेवा योजना तर्फे **'मी माणूस असाच आहे'** या शिर्षकाखाली पथनाट्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार होते तर भारतीय विद्यामंदिराचे सरचिटणिस डॉ. आराधना वैद्य, कोषाध्यक्ष डॉ. सतिष कुळकर्णी व रा. से. यो. सल्लागार समिती सदस्य डॉ. सुभाष गवई यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली. समाजामध्ये घडणा-या काही वाईट गोष्टीवर सामान्य माणसाची काय प्रतिक्रिया असते याचे सादरीकरण या नाट्याव्दारे केले. माणूस घडलेल्या वाईट घटनेवर कसा वागतो व कधी दुर्लक्ष करतो यावर प्रकाश टाकला आहे. पथनाट्याचे सादरीकरण महाविद्यालयात तसेच राजापेठ चौकात करण्यात आले. पथनाट्याला रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी प्रा.निलेश कडू, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. आम्रपाली वासनिक व सहकार्यक्रम अधिकारी प्रा. पंडीत काळे, प्रा. गायत्री चवाळे उपस्थित होते. पथनाट्याचे दिग्दर्शन सुरज जवळकर याने केले.

**4. सदभावना  दिवस (शपथ दिन):-**

20 ऑगष्ट 2015 रोजी दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांचा जन्म दिवस सदभावना दिवस म्हणून रा. से. यो. मार्फत साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार होते तर प्रमुख पाहूणे म्हणून प्रा. नितिन तट्टे, प्रा. अनिल खांडेकर व रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी प्रा.निलेश कडू उपस्थित होते. कार्यक्रमांतर्गत रासेयोच्या सर्व स्वयंसेवकांनी तसेच उपस्थित मान्यवरांनी सदभावना दिवसाची प्रतिज्ञा घेतली की, **“मी जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा विषयक भेद न करता सर्व भारतीय जनतेचे भावनिक ऐक्य आणि सामंजस्य यासाठी काम करीन”. मी आणखी अशी प्रतिज्ञा करतो की, “आमच्या वैयक्तीक किंवा सामुहिक स्वरुपाचे सर्व प्रकारचे मतभेद मी हिंसाचाराचा अवलंब न करता विचार विनिमय करुन व संविधानिक मार्गाने सोडविन”**. अध्यक्षीय भाषण करतांना डॉ. ए. जे. गादेवार यांनी सदभावना दिवसापासून सर्वांनी योग्य ती प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन सुरज जवळकर याने केले.

**5. स्वच्छता अभियान: -**

23 ऑगस्ट 2015 रोजी रा. से. यो. सभेचे औचित्य साधून स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले. रा. से. यो. च्या स्वयंसेवकांनी महाविद्यालयातील संपूर्ण परिसराची स्वच्छता केली. स्वच्छतेचे महत्व जाणून घेता साचलेल्या कच-याची व वाढलेल्या गवताची अभियाना अंतर्गत विल्हेवाट लावली. साचलेले पाण्याचे डबके, गांजर गवत, अस्थाव्यस्थ झाडांच्या फांद्या यामुळे डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणावर आढळत होती म्हणूनच स्वयंसेवकांनी ही मोहीम हाती घेतली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार यांनी स्वयंसेवकांशी हितगुज केली व झालेल्या स्वच्छतेची पाहणी केली.

**6. भागिनी सुरक्षा विमा योजना मार्गदर्शन व सेवा- सुविधा:-**

02 सप्टेंबर 2015 रोजी राष्ट्रीय सेवा योजना व माहेर बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ‘भागिनी सुरक्षा विमा योजना मार्गदर्शन व सेवा- सुविधा’ कार्यक्रम राबवण्यात आला. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल गादेवार लाभले. तसेच प्रमुख अतिथी म्हणून भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष तुषार भारतीय व माहेर बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापक सौ. सुरेखा लुंगारे लाभल्या. प्रधानमंत्री जन – धन योजनेअंतर्गत रक्षाबंधन निमित्य महिलांसाठी ‘भागिनी सुरक्षा विमा योजना’ संपूर्ण देशात राबविण्यात आली. तरी ही योजना घराघरापर्यंत पोहचवावी या उद्देशाने महाविद्यालयात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सुरक्षा विमा योजनेबद्दलची संकल्पना व विमा काढण्यासाठी लागणारी कागदपत्रे व

अटी याबद्दल विस्तृत माहिती सौ. सुरेखा लुंगारे यांनी दिली. तुषार भारतीय यांनी रा. से. यो. स्वयंसेवकांच्या माध्यमातून देशातील गोरगरीब, कष्टकरी बांधवांपर्यंत ही योजना पोहचली पाहिजे व या योजनेचे महत्व त्यांना पटवून देऊन सर्व भारतीयांनी याचा फायदा घेतला पाहिजे असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. कार्यक्रमाला रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी प्रा.निलेश कडू, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. आम्रपाली वासनिक व सहकार्यक्रम अधिकारी प्रा. पंडीत काळे, प्रा. गायत्री चवाळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन कु. रश्मी जिवतोडे हिने केले तर आभार कु. राधा ढोक हीने मानले.

### 7. वाहतुक नियम व अधिनियम मार्गदर्शन:-

08 सप्टेंबर 2015 रोजी राष्ट्रीय सेवा योजना मार्फत रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत 'वाहतुक नियम व अधिनियम' या विषयावर मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार होते तर भारतीय विद्यामंदिराच्या सरचिटणीस डॉ. आराधना वैद्य यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली. या. कार्यक्रमासाठी मुख्य मार्गदर्शक म्हणून माननिय निलीमा आरज (पोलीस वाहतुक निरीक्षक, अमरावती) लाभल्या. तसेच सं. गा. बा. अमरावती विद्यापीठाचे रा. से. यो. सल्लागार समिती सदस्य डॉ. सुभाष गवई, महिला सुरक्षा समिती सदस्या सौ. छाया पाचकडे व समाजसेविका अवंतिका मोहित्रो आवर्जून उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी आपल्या वाहानाच्या वेगाला आळा घालण्याची गरज आहे. आपल्या पाल्यांने अठरा वर्ष पूर्ण झाल्याशिवाय वाहन चालू नये याचे भान त्यांनी ठेवावे व वाहातुकीच्या नियमांचे उल्लंघन करु नये असे मत आपल्या मार्गदर्शनातून मा. निलिमा आरज यांनी मांडले. कार्यक्रमाचे संचालन कु. रश्मी जिवतोडे तर प्रास्ताविक प्रा. पंडीत काळे यांनी केले व आभार प्रदर्शन कु. सुरज जवळकर याने केले.

### ❖ राष्ट्रीय सेवा योजना सप्ताह:-

### 8. वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन (दत्तक ग्राम निंभोरा): -

23 सप्टेंबर 2015 रोजी राष्ट्रीय सेवा योजना सप्ताहाच्या निमित्याने दत्तक ग्राम निंभोरा ता. भातकुली येथे 'वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन' कार्यक्रम आयोजित करण्यात आला. रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू , सहकार्यक्रम अधिकारी प्रा. पंडीत काळे, गावातील पोलीस पाटील श्री. सुभाषराव यादगिरे व प्रतिष्ठीत  नागरिक श्री. रावसाहेब यादगिरे  यांच्या मार्गदर्शनाखाली रा. से. यो. स्वयंसेवकांनी गावातील मुख्य रस्त्याच्या आजुबाजूला, शाळेसमोर व घरासमोरील खुल्या जागेवर वृक्षारोपण करण्यात आले व वृक्ष संवर्धनाचे महत्व लोकांना पटवून दिले. वृक्षारोपणामध्ये कडूबदाम, निंब व निलगिरी या झाडांचा वापर

करण्यात आला. या सर्व अभियानामध्ये गावातील मुलांचा तसेच गावक-यांचा उत्कृष्ठ सहभाग लाभला व त्यांच्या सहकार्याने वृक्षारोपण करण्यास मदत लाभली.

**9. स्वामी विवेकानंद व आजचा युवक: -**

25 सप्टेंबर 2015 रोजी राष्ट्रीय सेवा योजना सप्ताहाच्या निमित्याने “स्वामी विवेकानंद व आजचा युवक” या विषयावर प्रा. रोशन प्रकाश राव (विभाग प्रमुख, इंग्रजी विभाग, तक्षशिला महाविद्यालय, अमरावती) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार होते तर रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू, महिला कर्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आम्रपाली वासनिक, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. पंडीत काळे, प्रा. गायत्री चवाळे उपस्थित होते.

**10. स्वच्छता अभियान: -**

26 सप्टेंबर 2015 रोजी रा. से. यो. सप्ताहाच्या निमित्याने महाविद्यालयामध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या कार्यक्रमामध्ये ‘एक कदम स्वच्छता की ओर’ अशी शपथ घेण्यात आली. प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार यांच्या उपस्थितीत सर्व विद्यार्थ्यांनी शपथ घेतली. रा. से. यो. च्या स्वयंसेवकांनी महाविद्यालयातील संपूर्ण परिसराची स्वच्छता केली. स्वच्छतेचे महत्व जाणून घेता साचलेल्या कच-याची व वाढलेल्या गवताची अभियाना अंतर्गत विल्हेवाट लावली. या सर्व अभियानाचे आयोजन रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू, सह कार्यक्रम अधिकारी प्रा. पंडित काळे व रा. से. यो. स्वयंसेवक यांनी केले.

**11. नेत्र तपासणी शिबीर:-**

28 सप्टेंबर 2015 रोजी रा. से. यो. सप्ताहाच्या निमित्याने दत्तक ग्राम निंभोरा येथे गावक-यांसाठी एकदिवशीय ‘नेत्र तपासणी शिबीर’ आयोजन करण्यात आले. शिबीराचे आयोजन श्री. रावसाहेब यादगिरे यांच्या घरी करण्यात आले. डॉ. पंकज लांडे (MBBS,DNBC (चेन्नई), FCRS) यांनी ग्रामस्थांची नेत्र तपासणी केली. नेत्र तपासणी दरम्यान मोतिबिंदू सारख्या विविध डोळ्यांच्या रोगांची तपासणी करण्यात आली. यामध्ये तब्बल 76 ग्रामस्थांनी आपले नेत्र तपासुन घेतले. यावेळी रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू, सह कार्यक्रम अधिकारी प्रा. पंडित काळे व प्रा. गायत्री चवाळे तसेच गावातील प्रतिष्ठीत नागरीक श्री. सुभाषराव यादगिरे , श्री. रावसाहेब यादगिरे, श्री. पंकज यादगिरे, श्री. विराज यादगिरे उपस्थित होते.

## 12. हिमोग्लोबीन तपासणी शिबीर: -

29 सप्टेंबर 2015 रोजी राष्ट्रीय सेवा योजना सप्ताहाच्या निमित्याने महाविद्यालयात विद्यार्थीनीसाठी रा. से. यो. व CCLT Course विभाग यांच्या संयुक्त विद्यामाने हिमोग्लोबीन तपासणी शिबीर आयोजन करण्यात आले. हिमोग्लोबीन तपासणीसाठी क्लिनिकल लेबॅरेटरी टेक्नॉलोजी विषयाच्या विभाग प्रमुख डॉ. दिपलक्ष्मी कुळकर्णी व त्यांची चमू यांचे सहकार्य लाभले. या शिबीरात एकून 150 मुलींची हिमोग्लोबीन तपासणी करण्यात आली. या शिबीराला रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आम्रपाली वासनिक, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. पंडीत काळे, प्रा. गायत्री चवाळे उपस्थित होते.

## 13. राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये युवकांचे योगदान: -

30 सप्टेंबर 2015 रोजी रा. से. यो. सप्ताहाच्या निमित्याने "राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये युवकांचे योगदान" या विषयावर डॉ. सुभाष गवई (रा. से. यो. सल्लागार समिती सदस्य सं. ग़ा. बा. अमरावती विद्यापीठ, अमरावती) यांचे व्याख्यान आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. पी. एस. रवाळे होते तर रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आम्रपाली वासनिक, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. पंडीत काळे, प्रा. गायत्री चवाळे उपस्थित होते.डॉ. सुभाष गवई य़ांनी आपल्या भाषणादरम्यान युवकांना संबोधीत करत असतांना आपल काहीतरी समाजासाठी देणं लागात, कागदी पदवीच्या मागे न लागता पदवीचा गाभा समजून घेवून देशहितासाठी कार्य करावे, नविन तंत्रज्ञान विकसित होत आहे मात्र शेतक-यांच्या आत्महत्येच्या संख्येचे प्रमाण कायम आहे. या मागील शास्त्र शोधण्याची आवश्यकता आहे असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. डॉ. अनिल खांडेकर प्रा. नितीन तट्टे, डॉ. दया पांडे, प्रा. विद्या पाथरकर या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते.

## 14. 'आनंदी जीवन' या विषयावर मार्गदर्शन: -

01 आक्टोबर 2015 रोजी रा. से. यो. सप्ताहाच्या निमित्याने 'आनंदी जीवन' या विषयावर डॉ. अलका गायकवाड (विभाग प्रमुख, मराठी विभाग) यांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाला रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आम्रपाली वासनिक, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. पंडीत काळे, प्रा. गायत्री चवाळे व डॉ. अनिल खांडेकर, प्रा. नितीन तट्टे, डॉ. आराधना वैद्य, डॉ. दया पांडे, प्रा. विद्या पाथरकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या डॉ. अलका गायकवाड यांनी विद्यार्थ्यांसमोर आंनंदी जीननाच रहस्य प्रस्तापीत करत जीवन जगण्याची कला आपण

बणवली पाहिजे असा संदेश त्यांनी दिला. आपण स्वत:वर प्रेम केले तरच इतरांना प्रेम व आंनद आपण देवू शकतो असे त्या यावेळी म्हणाल्या, आपण आपल्या जीननात स्वत:चे निर्णय स्वत: घ्यावेत दुस-यांच्या निर्णयावर आपण आनंदी होवू शकत नाही असेही प्रतिपादन त्यांनी केले.

## 15. आदर्श ग्राम राळेगणसिध्दी व हिवरेबाजार सहल: -

05 ते 08 ऑक्टोबर 2015 पर्यंत रा. से. यो. विभागातर्फे शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली. सहल **राळेगणसिध्दी ( समाजसेवक, मा. श्री. अण्णा हजारे आदर्श ग्राम) व हिवरेबाजार (मा. श्री. पोपटराव पवार आदर्श ग्राम)** याठिकाणी आयोजित करण्यात आली. रा. से यो. स्वयंसेवकांना आदर्श ग्राम संकल्पना प्रत्यक्षात अनुभवता यावी हा या सहलीमागचा उद्देश होता. 06 ऑक्टोबर 2015 रोजी समाजसेवक, मा. श्री. अण्णा हजारे यांच्या आदर्श ग्रामची पाहणी स्वयंसेवकांनी केली. स्वच्छता, पाण्याचे नियोजन, श्रमदानातून एकजुटीतून उभे केलेले प्रकल्प, हरीतक्रांती, वृक्षारोपन व वृक्षसंवर्धन, व्यसनमुक्ती व उदर्निवाह करण्यासाठी रोजगार या सर्व सामाजिक कार्याचा अनुभव स्वयंसेवकांनी प्रत्यक्षात घेतली. त्याचसोबात स्वयंसेवकांना, समाजसेवक, मा. श्री. अण्णा हजारे यांच्यासोबत चर्चा व त्यांच्या मार्गदर्शनाचा अनुभव स्वयंसेवकांना आला. जवळपास 2 तास समाजसेवक, श्री. अण्णा हजारे यांनी स्वयंसेवकांना चर्चा व मार्गदर्शनासाठी वेळ दिला. यामध्ये सामाजिक, राजकीय व भविष्यातील समस्या यावर समाजसेवक, श्री. अण्णा हजारे यांनी मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांना प्रश्न विचारलीत. खरोखरच कुठलीही शासनाची मदत न घेता ग्रामस्थांच्या श्रमदानातून एक आदर्श ग्राम निर्माण होवू शकते याचा प्रत्यक्षात अनुभव विद्यार्थ्यंना आला.

07 ऑक्टोबर 2015 रोजी आदर्श ग्राम हिवरेबाजारला स्वयंसेवकांनी भेट दिली. मा. श्री. पोपटराव पवार यांनी शासनाच्या योजनेतून आदर्श ग्राम निर्मिती कशी केली याचा प्रत्यक्षात अनुभव स्वयंसेवकांनी घेतला. पाणि अडवा पाणि जीरवा, एक घर एक झाड, सांडपाण्याचे नियोजन, गावाची रचना व गावक-यांसाठी सर्व सुख सुविधा एका खेडे गावातसुध्दा उपलब्ध होवू शकतात याचा अनुभव विद्यार्थ्यांना आला. याठिकाणी मा. श्री. पोपटराव पवार यांचे सहका-याचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. त्यांनी मा. श्री. पोपटराव पवार यांच्या कार्याचा व त्यागाचा उजाळा याठिकाणी केला. दुग्ध व्यवसायातून स्वयं रोजगार कसे निर्माण करता येते याचे सुद्धा मार्गदर्शन त्यांनी केले. यातून विद्यार्थ्यांना मा. श्री. पोपटराव पवार यांच्या कार्याचा गौरव अनुभवता आला व त्यांच्याशी चर्चा करता आली.

सहलीचे आयोजन प्रा. निलेश कडू व प्रा. पंडीत काळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यामध्ये एकूण 52 स्वयंसेवकांनी भाग घेतला.

**16. सरदार वल्लभभाई पटेल जयंती: -**

31 ऑक्टोबर 2014 रोजी सरदार वल्लभभाई पटेल जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार यांनी भुषविले. या कार्यक्रमाला भारतीय विद्यामंदीराच्या सरचिटणीस डॉ. आराधनाताई व भारतीय विद्यामंदीराचे उपाध्यक्ष श्री. रमेश बिजवे यांनी प्रमुख उपस्थिती दर्शविली. तसेच या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**17. रक्तदान शिबिर: -**

06 डिसेंबर 2015 रोजी राष्ट्रीय सेवा योजना व एच. डी. एफ. सी. बँक, अमरावती तर्फे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबीराचे उद् घाटन भारतीय विद्यामंदीराच्या सन्माननिय सरचिटनीस डॉ. आराधना वैद्य यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार, एच. डी. एफ. सी. बँक चे श्री. पंकज भैया व श्री.मयुर वस्ताणी उपस्थीत होते. रक्तदान शिबीरास संत गाडगे बाबा ब्लड बँक, अमरावतीचे डॉ. जोशी व त्यांचे चमू यांचे सहकार्य लाभले. या शिबिरामध्ये एकूण 57 महाविद्यालयीन विद्यार्थींनी रक्तदानाचा हक्क बजावला. रक्तदान शिबीराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू, प्रा. आम्रपाली वासनिक, प्रा. पंडीत काळे, प्रा. गायत्री चवाळे व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी केले.

**18. "स्वच्छ भारत अभियान" अंतर्गत दत्तक ग्राम निंभोरा येथे स्वच्छता:**

07 डिसेंबर 2014 रोजी "स्वच्छ भारत अभियान" अंतर्गत दत्तक ग्राम निंभोरा ता. भातकुली येथे ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात आले. रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश कडू, गावातील पोलीस पाटील श्री. सुभाषराव यादगिरे व प्रतिष्ठीत नागरिक श्री. रावसाहेब यादगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली रा. से. यो. स्वयंसेवकांनी ग्राम स्वच्छता केली. गावातील गाळाने तुडूंब भरलेल्या सांडपाण्याच्या नाल्या स्वयंसेवकांनी साफ केल्या तसेच घराबाहेरील सांडपाण्याचे सोचखड्डे साफ करुन व आजुबाजूचे गवत काढून घरासमोरील परिसर स्वच्छ केला व घरातील पुरुषांना व महिलांना स्वच्छतेचे व आरोग्याचे महत्व पटवून दिले. त्याचप्रमाणे गावातील तरुण मुलांच्या सहकार्याने रस्त्याच्या आजुबाजूचे गवत काढून सर्व रस्ते झाडूने झाडून स्वच्छ केले. या सर्व अभियानामध्ये गावातील मुलांचा तसेच गावक-यांचा उत्कृष्ठ सहभाग लाभला व त्यांच्या सहकार्याने ग्राम स्वच्छता करण्यास मदत लाभली.

## 19. पथनाट्यातून जनजागृती: -

26 जानेवारी 2016 रोजी प्रजासत्ताक दिनाच्या पर्वावर ध्वजारोहण नंतर राष्ट्रीय सेवा योजना तर्फे **'तरुणांचे जागृतीकरण'** या शिर्षकाखाली पथनाट्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे. गादेवार होते तर भारतीय विद्यामंदिराचे सरचिटणिस डॉ. आराधना वैद्य, तसेच NCC अधिकारी डॉ. संग्राम रघुवंशी, डॉ. मंगला भाटे यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली. पथनाट्याचे सादरीकरण महाविद्यालयात तसेच राजापेठ चौकात करण्यात आले. पथनाट्याला रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी प्रा.निलेश कडू, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. आम्रपाली वासनिक व सहकार्यक्रम अधिकारी प्रा. पंडीत काळे, प्रा. गायत्री चवाळे उपस्थित होते. पथनाट्याचे दिग्दर्शन हर्षल धांडे, शुभम हिवराळे यांनी केले.

**डॉ. ए. जे. गादेवार**
**प्राचार्य**

**प्रा. निलेश कडू**
**कार्यक्रम अधिकारी**

**डॉ. आम्रपाली वासनिक**
**महिला कार्यक्रम अधिकारी**

**प्रा. पंडीत काळे**
**सहकार्यक्रम अधिकारी**

**प्रा. गायत्री चवाळे**
**सहमहिला कार्यक्रम अधिकारी**